RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ५४] गुरुवार, एप्रिल २१, २०२२/वैशाख १, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१९६/तांशि-४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) यांच्या कलम ८ च्या पोट-कलम (५) तसेच कलम १२ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५७/तांशि-४, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ (यांत यापुढे जीचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे.) प्रसिद्ध केली आहे आणि प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षांना प्रदान करावयाचे वेतन व भत्ते आणि उक्त प्राधिकरणांच्या सदस्यांना प्रदान करावयाचे भत्ते अधिसूचित केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या सदस्यांना प्रदान करावयाच्या बैठक उपस्थिती भत्त्यात वाढ करणे महाराष्ट्र शासनाला उचित वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) यांच्या कलम ८ च्या पोट-कलम (५) तसेच कलम १२ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५७/तांशि-४, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. उक्त अधिसूचनेच्या खंड तीन ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" ३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे व शुल्क नियामक प्राधिकरणाचे सदस्य, पुढील भत्त्यांकरिता पात्र असतील :—

(क) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता मिळण्यास पात्र असतील.

(ख) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे पूरक भत्ता मिळण्यास पात्र असतील.

(ग) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे प्रवास भत्ता मिळण्यास पात्र असतील.

(घ) बैठक उपस्थिती भत्ता प्रति बैठक रूपये ७,५०० या दराने."

२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे व शुल्क नियामक प्राधिकरणाचे सदस्य, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सुधारित भत्ते मिळण्यास पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

# HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st April 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. MISC 2021/CR 196/TE-4.— Whereas the Government of Maharashtra *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, Notification No.Misc.2015/CR 457/TE-4, dated the 30th November 2015 (hereinafter referred to as the "said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 8 read with section 12 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah.XXVIII of 2015), and notified the salary and allowances to be paid to the Chairperson of the Admissions Regulating Authority and Fees Regulating Authority and allowances to be paid to the Members of the said Authorities ;

And whereas the Government of Maharashtra considers it expedient to increase the meeting attendance allowances to be paid to the members of the Admissions Regulating Authority and Fees Regulating Authority ;

Now, therefore in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 8 read with section 12 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015, the Government of Maharashtra hereby amends the Government notification, Higher and Technical Education Department, Notification No. Misc. 2015/CR 457/TE-4, dated 30th November 2015, as follows, namely :—

1. For clause 3 of the said Notification, the following clause shall be substituted, namely :—

"3. Members of the Admissions Regulating Authority and Fees Regulating Authority shall be entitled to following allowances, namely :—

(*a*) Dearness allowance shall be entitled to as per All India Services Officers ;

(*b*) Compensatory allowance shall be entitled to as per All India Services Officers ;

(*c*) Travelling allowance shall be entitled to as per All India Services Officers ;

(*d*) Meeting attendance allowance at the rate of 7,500 per meeting.

2. The Members of the Admissions Regulating Authority and Fees Regulating Authority shall be entitled to the revised allowances from the date of publication of this notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.